पुढारी दि. 3.9.25


# लोह्यात दोन पिस्टल विकताना दोघे जेरबंद

## पिस्टलचा वापर व्यापाऱ्यांना धमकवण्यासाठी

**लोहा, पुढारी वृत्तसेवा :** नांदेड जिल्ह्यात अनेक वर्षांपासून गावठी पिस्टल विक्री सुरू असून अशाच पिस्टल विक्री करण्यासाठी आलेल्या दोघा जणांना स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून दोन पिस्टल, १४ जिवंत काडतूस, दोन दुचाकी असा एकूण २ लाख ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई १ सप्टेंबर रोजी सायंकाळी लोहा येथील शनी मंदिराच्या मागे करण्यात आली.

लोहा येथील शनी मंदिराच्या मागे दो-घेजण पिस्टल विक्री करण्यासाठी आल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे आणि पथकातील अंमलदार यांना मिळाली. या माहितीवरून पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली या पथकाने सापळा रचून आनंद उर्फ चिन्नू सरदार यादव (वय २४), रा. वजीराबाद चौरस्ता नांदेड आणि जावेद उर्फ लड्या रहेमत शेख (वय २१) रा. जामा मस्जिदजवळ विष्णुपुरी या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडून प्रत्येकी एक गावठी स्टीलची पिस्टल आढळून आली. तसेच १४ सात जिवंत काडतूस आणि दोन दुचाकी असा एकूण २ लाख ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेने पकडलेल्या या दोन्ही आरोपींना लोहा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे, पोहेकॉ रविशंकर बामणे, पोकॉ चंद्रकांत स्वामी, पोकॉ अझरुद्दीन शेख, पोकॉ अनिल बिरादार, सायबर सेलचे पोहेकॉ राजू सिटीकर, पोहेकॉ दीपक ओढणे यांनी केली. या कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्थानिक गुन्हा शाखेच्या या पथकाचे कौतुक केले आहे.



लोहा पोलिसांनी जप्त केलेले पिस्टल. खाली बसलेले आरोपी.

**• जिल्ह्यात अवैध पिस्टलची विक्री वाढल्याने गुन्ह्यांमध्येही वाढ होत आहे. अशा अवैध पिस्टलचा वापर व्यापाऱ्यांना धमकवण्यासाठी केला जात आहे. त्यातून नवनव्या गुन्हेगारी टोळ्याही उदयास येत आहेत. गावठी पिस्टल उपलब्ध होत असल्याने गुन्हेगारांमध्येही दिवसेंदिवस वाढ होत आहे. या बाबीस आळा घालण्यासाठी आता पोलिसांना विशेष मोहीमच राबवावी लागणार आहे.**